# सहाण

## चंदन विचारे



a

# सहाण

चंदन सुभाष विचारे

ई साहित्य प्रतिष्ठान

**सहाण (मुक्तछंद लघुकथा):**

**चंदन सुभाष विचारे**

संपर्क : ९६६४५०८४६४.

निवास स्थान : बी . एम . सी . इमारत क्र . सी /४ , खोली क्र . १५

सरदार नगर -४ , रावळी  कॅम्प फायर ब्रिगेड जवळ ,

सायन - कोळीवाडा , मुंबई -४०००३७.

ईमेल : chandanmanse@gmail.com.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे  तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

## प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

**e**sahity@gmail. com

**e**Sahity Pratishthan

**e**leventh floor

**e**ternity

**e**astern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

App : https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.

प्रकाशन : ०७/०७/२०१७

©esahity Pratishthan®2017

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य - प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे .

**प्रस्तावना :**

काही माणसं हि दिसायला साधी असतात . पण त्यांचे अंगभूत कलागुण, सामाजिक क्षेत्रातील कार्य , त्याबद्दल असलेली त्यांची ओढ, तळमळ आणि चिकाटी पहिली ना कि , आपल्यालाच कसं चुकल्यासारखं होतं. हि माणसं दिसतात तशी नसतात मुळी, हि सतत नजरेत स्वप्नं घेऊन फिरत असतात. आणि त्या स्वप्नासाठीच जगत असतात. लढा देऊन, संघर्ष करून .....ते स्वप्नं साकारण्यासाठी ..सिद्धीस नेण्यासाठी .

हा अवलिया देखील असाच.

नावातच 'चंदन' आणि 'चंदनाप्रमाणेच' त्याचे कलागुण हि...

भटकण्याची आवड, त्यामुळे पाऊलं त्याची, सतत इथून तिथे, कुठे ना कुठे , कुठल्याश्या गोष्टीचा मागोवा घेत राहतात. ते हि अगदी डोळसपणे आणि संवेदनशील अश्या सदहृदयी मनाने..

म्हणूनच त्याच्या लिखाणातही तशी विविधता दिसून येते. . दादरच्या नारळी बागेत , तिथे निवांत एकांतात गढून, स्वतःशी 'संवाद' साधत , हृदयाशी अलगद झुलणाऱ्या आणि मनाला हळुवार स्पर्शणाऱ्या कथा त्याने इथेच लिहिल्यात.

त्यातली 'नारळी बाग' म्हणजे तुमचा आमचा सगळयांचाच असा जिव्हाळयाचा 'विषय'. हो ना ?

अर्थात असणारच..

कधीतरी सहज म्हणून मारलेला तो फेरफटका असेल, मित्र मैत्रणीसोबत मारलेल्या निवांत  गप्पा, प्रेयसीसोबत पाहिलेली चिक्कार स्वप्नं किंव्हा सामाजिक बांधिलकी म्हणून आखलेल्या त्या घडामोडी असतील. पावसाळी गाणी असतील. काव्यात्मक सुगम संगीत असेल.

हि नारळी बाग म्हणजे तुमच्या आमच्या  'आठवणींचा हिंदोळाच ' , ह्याचं यथार्थ असं चित्रण त्याने उभं केलंय . ते सगळं वाचतांना आपण त्या क्षणाशी एकरूप  होऊन  जातो. मिसळून जातो.

त्याच्या 'मैत्री' ह्या कथेतून ..हि त्याने समाजातील ,समाजाला आक्षेप असणाऱ्या गोष्टीवंर आपला रोख धरलाय.  दोघांचीही म्हणजे त्याची आणि  तिची घनिष्ट अशी  'मैत्री' असल्यावर, त्याच तिच्या घरी किंव्हा तिचं त्याच्या घरी .." येणं, एकत्रित राहणं आणि आपल्या मैत्रीला अनमोल आठवांची जोड देणं "  हे आजही आपल्या समाजाला  न पटणारं आहे . न मानवणारं  आहे आणि ते सहजा मान्य होणारं हि   नाही. लोकं वेगळ्या नजरेने आणि विचारधारेने त्या  गोष्टीकडे  पाहतात.  तोलतात .

तरुण मुलगा मुलगी एकत्रित येणं,  राहणं.  म्हणजे तसलं  वगैरे काही  ..हे असे प्रश्न उपस्थित होतात.

ते खरं आहे.

पण जिथे 'मैत्रीची' विश्वनीय घडी आहे.  'मैत्री'  दृढ आहे . नात्यातल्या 'जाणिवांची' एकमेकांना समज आहे.  तिथे अश्या एकत्रित राहण्याला काही हरकत नसावी.  आपल्या कुटुंबीयांना  आणि समाजाला सुद्धा....

अर्थात त्यासाठी त्यांचा , म्हणजेच ह्या समाजाचा आणि कुटुंबीयांचा  'विश्वास' राखणं आणि तो जिंकणं महत्वाचं ठरेल.

'मैत्री' हि कथा वाचताना ....हे सगळं आपण अनुभवतो. त्या दुनियेत विसावलो जातो.

ह्याच समाजात....

आजच्या ह्या काळानुसार , स्वतःत... बदल घडवत जाणारी हि तरुण पिढी , त्यांचं करिअर , मोकळेपणाची (फ्रिडम ) त्यांची ठरलेली व्याख्या , लग्नाबाबतचे आचार विचार , ह्या गोष्टीवर भाष्य करणारं 'काँट्रॅक्ट मॅरेज' सारखा हा विषय देखील तितकाच मनाशी उमटला जातो.

राहुल अन निशा हे जरी काल्पनिक पात्र घेतलं असलं तरी , आपल्या समाजातील सध्या स्थितीच ते प्रतिनिधित्व करतात.

दोघेही भिन्न स्वभावाचे ,भिन्न विचारांचे , दोघांचाही लग्नाला विरोध , असं असताना देखील घरच्यांच्या ईच्छेखातर 'लग्न' करण्याचा निर्णय घेणं ,त्यासाठी वर्षभराचा करार करणं आणि सरतेशेवटी, केलेला करार घटका मोजत असताना, सहवासातून मुरलेल्या अन नवं निर्मिलेल्या प्रेमाची जाणीव होणं ..... ह्याचं सुंदर वर्णनं त्यानं केलं आहे . ते वाचनीय आहे.

थोडी प्यारवाली थोडी चाळवाली -लव्ह स्टोरीतूनही त्याने अशीच वेगळी कथा मांडलेय.

प्रेमा विषयक असलेला समाजमनाचा खोटा मुखवटा काढून , प्रेम म्हणजे नक्की काय ? ह्याच सुंदर 'उदाहरण' त्याने आपल्या ह्या कथेतून आपल्यापुढे मांडलं आहे.

'जाती 'सारखा , आजही समाजमनाला चिटकून असलेला 'विषय' त्याने चांगला हाताळला आहे. .

इतर लेख हि तुम्हाला नक्कीच आवडतील. ह्यात दुमत नाही .

कारण विषय 'तो ती आणि पाऊस' आहे. लिहल्या गेलेल्या अनाहूत 'पत्राचा' आहे . श्वासातून उसवलेल्या त्या घट्ट 'मिठी'तला आहे .

तुम्हाला तुमच्या त्या आठवणीची जाण करून रोमांच फुलवून देणारी अशी हि लेखमाला आहे.

तुम्हाला ती नक्कीच आवडेल. मनाशी रुजेल.

मित्रा मला प्रस्तावनेसाठी लिहतं केल्याबद्दल धन्यवाद ..!

पुढील लेखनासाठी भरभरून अश्या शुभेच्छा !

- संकेत पाटेकर .

**प्रस्तावना :**

"माझ्यासाठी थांबलीस

अन मीही थांबलो वाट पहात

तु तरी काय करणार..?

पावसात भिजायला तु आतुर

अन मी आधीच भिजलेला

तु तरी काय करणार..?"

शाळेच्या गेटपासुन पडलेला हा प्रश्न अगदि महाविघालय असो किंवा ऑफिस ते घर .प्रेमाची सुरूवात हल्ली ईथुनच होते.

म्हणूनच *प्रेम म्हणजे प्रेम असते तुमचे आमचे सेम असते* हे शब्द चटकन ओठांवर कधीही येतात..मग ती दादरची *नारळीबाग*असो..एखादी टुमदार *चाळ*असो.प्रेम व्यक्त करायला जागेची अडचण नसली तरी...समाजातील *जात* कधी *मानसन्मान* कधी *प्रतिष्ठा*तर अगदीच *धर्म*असे अडथळे समोर असतात.हे सर्व लिलया पार करण्याची एक जबाबदारी घेतलेल्या एका भटक्या अवलियाचा हेतु हा निरागस प्रेमाला योग्य रितीने मांडुन त्याचा आनंद कसा घेता येईल हे सांगायचं आहे.

अवलिया *चंदन विचारे* नावातुनच *चंदनासारखा झिजणारा* *विचारपुर्वक मांडणारा* असा एक. भावनेची मांडणीच मुळी इतकी सहज सुंदर आहे की *सहज सुचलेल* ह्या त्याच्या वाक्यात सहजता हि वास्तविक प्रसंग डोळ्यासमोर उभा करण्यात तो यशस्वी झालाय.

तो-ती आणि समाज हे गणित सोडविण्यासाठी स्त्रीलिंग-पुल्लिंग  हे फक्त व्याकरणा पुरतच मर्यादित असावे नाहि तर याच भेदभावात जगण्यासाठी कॉन्ट्रक्ट मॅरेज  एखाद्या कोरीव लेण्यासारख कोरले जातेच..त्याने या विषयावर सहजच लिहतांना भिन्नलिंगी स्वभावाच्या घालमेलीची अचुकता टिपलेली आहेच.

मुंबापुरीची जडणघडण चाळीतुनच सरकतेय अजुनही..थोडी प्यारवाली ..थोडी चाळवाली लव्हस्टोरी..चाळीतले प्रेम आणि उभे राहणारे आयुष्य हे आताच्या शेकडो मजली टॉवर सारखे अपेक्षा भरुन अवकाशाला टेकलेले असते..आयुष्यातील एक यशस्वी शिखर असते जर पाया मजबुत असेल तरच ..अन्यथा सध्या अनेक चाळी व्हेन्टिलेटर आहेतच..तशी पायाच नसलेली लव्हस्टोरी घटस्फोटा च्या पायऱ्या चढलेली ऐकीवात येताच.

लिहिलेल्या एकएक शब्दसंकल्पना हा तुम्हाला प्रेम करायला हक्काने सांगणारा नक्कीच आहे..हे लेखन तुमची-आपली-माझी हक्काची जागा समजतो..प्रेम नक्कीच शोधतो..!

*॥मर्यादेन विराजते॥*

एक सहजच लिहलेली प्रस्तावना - *मार्तंड राजन माजलेकर*

## माझे मनोगत :

नमस्कार मंडळी !



मी चंदन सुभाष विचारे. राहणारा सायन कोळीवाडा येथील. माझं मूळ गाव गुहागर निसर्गरम्य तालुक्यातील काळसूर कौंढर. माझं शिक्षण टी.वाय. बीकॉम पर्यंत. पोटापाण्यासाठी मी फोर्टला एका लॉजिस्टिक कंपनीत कस्टमर सर्व्हिस एक्सिक्युटीव्ह म्हणून काम करतो खरा पण मन मात्र सदैव इतिहासात गुंतलेले असते. हो कारण इतिहास , गड -किल्ले हे माझे आवडते विषय.

खरं तर मी एक जातिवंत भटका सह्याद्रीत भटकणारा.कविता , चारोळया हे सुरु होतच आधीपासून , हे सारं सुरु असतानाच कोण्या एके दिवशी सह्याद्रीची साद ऐकू आली आणि मग पाठीला सॅक अडकवून मी आणि आमचे बंधुराज दोघांनीही सह्याद्रीच्या गड -किल्ल्यांची भटकंती सुरु केली. हो पण नुसतीच भटकंती काय कामाची ? या भटकंतीला जोड असावी लिखाणाची असे मनात आले म्हणून मी आम्ही केलेल्या भटकंतीचा इतिवृत्तांत सुचेल त्या शब्दांत मांडायला सुरुवात केली. हळूहळू माझी प्रवास वर्णने वाचकांच्या पसंतीस उतरू लागली. यातूनच वाचनाचा छंद जडला. मग काय विचारता ! श्री. व. पु. काळे , श्री. ना. सं. इनामदार , श्री. गो.नी. दांडेकर , श्री. बाबासाहेब पुरंदरे , श्री. आप्पा परब , श्री. रणजित देसाई ,श्री. विश्वास पाटील , या आणि अशा अनेक प्रतिभावंतांची पुस्तके वाचत सुटलो. त्यातल्या त्यात श्री. व पु. काळे आणि श्री.गो. नी. दांच्या भाषाशैलीने तर अक्षरशः झपाटून सोडलं. मनात कुठेतरी वाटू लागलं , आपल्याला हे असं लिहायला यायला हवं. माझ्या प्रवासवर्णनांनी तर काहींच्या डोळयांसमोर तो प्रसंग जसाच्या तसा उभा राहिला. अर्थात हे वाचकांनीच लिहून कळवलं. माझं लिखाण वाचकांच्या पसंतीस उतरू लागलं. सवयच लागली म्हणा ना. मग मेसेंजरवर , व्हाट्सअँपवर किंवा प्रत्यक्ष

भेटल्यावर वाचकांकडून विचारणा होऊ लागली " बरेच दिवस तुझ काही नवीन वाचायला मिळालं नाही " , " नवीन काही सुचल कि नाही " वाचकांच्या या प्रतिक्रियाच माझ्या लेखणीला बळ देत गेल्या आणि मी  लिहिता झालो.  असो पुढे मागे या प्रवास वर्णनांवर सुद्धा एखादे पुस्तक लिहेन अशी स्वतःशीच अपेक्षा बाळगतो.

कविता , चारोळया, प्रवास वर्णने हे सारं कमी कि काय ! म्हणून मी पुढे जाऊन प्रेम या माझ्या आवडत्या आणि हक्काच्या विषयावर लघु मुक्तछंद संवाद कथा लिहायला सुरुवात केली. एक एक करता या कथा सहज सुचत गेल्या आणि मी लिहीत गेलो , या हि कथा वाचकांच्या पसंतीस उतरल्या. त्यांना आपल्याशा वाटू लागल्या. वाचता वाचता हि कथा त्यांच्याच  आयुष्यातील एखाद्या प्रसंगावर तर नाही ना असे वाटू लागले त्यांना , कथेतील या पात्रांत ते स्वतःला पाहू लागले. बघता  बघता या कथांचा एक संचच तयार झाला आणि मग तो तुम्हा वाचकांच्यासमोर पुस्तकरूपाने आणावासा वाटला. म्हणून मी केलेला हा छोटासा प्रयत्न. या कामात ई  साहित्य प्रतिष्ठानच्या श्री. सुनील सामंत यांची मोलाची साथ , मदत आणि मार्गदर्शन लाभले. आभार मानून त्यांना परकं  करणार नाही. मी ई साहित्यची बरीचशी पुस्तकं वेळ मिळेल तेव्हा वाचत असतो. छान  वाटतं.

शेवटी एवढच सांगेन कि, तुम्ही हे पुस्तक आपला अमूल्य वेळ काढून नक्की वाचा. आणि हो आपल्या मौल्यवान प्रतिक्रिया द्यायला मात्र  अजिबात विसरू नका. माझा ईमेल आयडी  वर दिलेला आहे , संपर्क क्र. हि आहेच. फेसबुक , व्हाट्सअँप किंवा मग प्रत्यक्ष भेटून आपल्याला हे पुस्तक कसं  वाटलं हे मला व ई साहित्य प्रतिष्ठानला  जरूर कळवा. तुमच्या प्रतिक्रिया मला पुढील लिखाणासाठी मार्गदर्शक ठरणार आहेत.

आपला नम्र

चंदन सुभाष विचारे.

अर्पण पत्रिका :

प्रेम हा तुमच्या आमच्या सर्वांच्याच आवडीचा विषय.प्रेम या विषयावर कविता ,चारोळ्या लिहित असताना या प्रेमकथांकडे कधी वळलो माझं मलाच कळलं नाही.जितक्या सहज सुचल्या तितक्याच सहज सोप्या शब्दांत त्या लिहून काढल्या.एक तर पहाटे ४.३० वाजता सुचली तर काही माझ्या आवडत्या नारळी बागेत बसल्या बसल्या.म्हणूनच माझं हे पहिलं पुस्तक  जिथे या कथा सुचल्या त्या माझ्या आवडत्या "नारळी बागेला" आणि जिच्यावरून सुचल्या त्या माझ्या कल्पनेतल्या" काव्या "ला अर्पण करताना मला अतिशय आनंद होत आहे..

- चंदन विचारे.

# सहाण

1} <u>पत्र  लिहिण्यास कारण कि</u> :

प्रिय काव्या,

पत्र  लिहिण्यास कारण कि,

हल्ली आपल्यात सुप्रभात, जेवलीस का?  आणि शुभरात्र, यापलीकडे काही बोलणंच होत नाही. तक्रार नाही करतये,  ना-ही तुला दोष देत आहे. समजू शकतो मी, प्रत्येकाला आपआपलं वैयक्तिक आयुष्य असतं  तसं  ते तुलाही आहेच. तुझं ऑफिस, तुझं  कामं त्याचा व्याप, तुझी मित्रमंडळी  तुझं घर हे सारं सांभाळत असताना तुझीही तारांबळ उडत असेल. पण तरीही वाटतं आपल्या जवळच्या माणसांशी बोलण्यासाठी थोडा वेळ काढाव गं, तेवढच बरं वाटतं आणि मनमोकळं  झाल्याचा  फीलही येतो. अधून मधून बोलायला हवं, भरपूर गप्पा मारायच्या अगदी रात्र सरेपर्यंत, वेळेचं  कुठलही भान न ठेवता अगदी आपण पूर्वी मारायचो ना तश्या. यातून काय साध्य होईल ते माहित नाही मला; पण ह्या अश्या संवादातून माणसाचे स्वभावरंग काळात जातात, माणसं  ओळखणं सोपं होऊन जातं मग. ह्या सोशल मीडियामुळे आपण कधी नव्हे ते खूप जवळ आलो नाही? आभारच मानायला हवे खरे तर. नाही तर तू एका टोकाला आणि  मी एका टोकाला. पृथ्वी गोल आहे हे समीकरण पटायला लागलय मला त्यामुळेच. आपल्यातल नातं तसं  मैत्रीचं पण मित्र म्हणून तरी आपण असे कितीसे ओळखतो एकमेकांना?

पटतंय ना तुला? माणसांनी ना व्यक्त व्हायला शिकलं  पाहिजे.  नाहीतर विचारांचं शेवाळं साचून राहतं मनाच्या डबक्यावर. मनाचं डबकं  होता कामा  नये. अन त्यावर शेवाळी साचत कामा  नये. विचार, मतं  मनातून, ओठातून, शब्दातून खळखळाट वाहणाऱ्या झऱ्याच्या पाण्यासारखे वाहवत राहिले पाहिजेत. तुला मी मागे म्हटलं होता ना  कि, मला जेव्हा एकटा वाटतं  ना तेव्हा मी समुद्र किनारी जातो आणि त्याच्यापाशी निर्माल्य वाहतात ना तसे वाईट

विचार वाहून टाकतो अन पुन्हा नव्या विचारांचे शंख, शिंपले, मोती घेऊन येतो सोबत. हळूहळू का होईना पण माझे विचार लोकांना आवडू लागलेत. माझं लिखाण त्यांना आवडू लागलय. हे असं नवीन नवीन काहीतरी सुचायला हवं ना. पण त्यासाठी आपल्यात संवाद तर घडायला हवा. आता यावर तू म्हणशील कि माझा आणि तुझ्या लिखाणाचा काय संबंध? तुला ठाऊक ये ना तू माझी प्रेरणा आहेस. म्हणूनच तुला सांगत असतो काहीतरी का होईना पण बोलत रहा. आपल्या संवादाच्या माध्यमातून का होईना पण लोकांना नवी काहीतरी वाचायला मिळाल्याचं समाधान तर लाभेल. असो तुला तुझी कामं असतील ती लवकर आटप मग बोलू आपण निवांत..

## 2} **<u>मैत्री</u>:**

आज ऑफिसमधनं  निघतानाच अचानक तिचा फोन आला.

ती : "हॅलो  ऐक ना, काय करतोयस?

मी : " काही नाही का गं?. पीसी जस्ट शट डाऊन केलाय. घरी निघायची तयारी. "

ती- बरं ऐक ना माझे आई बाबा आज रात्री काही कामानिमित्त गावी जातायत. मी घरी एकटिच असेन. ताईला बोलवायला काही हरकत नाही. पण नको, मी तुझ्या घरी आले तर चालेल का दोन दिवस रहायला? ".

तशी एकमेकांच्या घरी जाण्या-रहाण्याइतपत आम्हा दोघांची मैत्री घट्ट आणि जुनी होती. नुसती मैत्री बरं का, त्यापलीकडे काही नाही. नाही तर तुम्ही उगाच नको ती स्वप्न रंगवाल. मी हि लगेच हो म्हटलं,

ती : " मी घरी जाऊन कपडे वगैरे पॅकिंग  करते आणि जेवून निघते लगेच आईबाबांसोबतच बाहेर. तु स्टेशनला येशील ना घ्यायला? ट्रेनमधे बसली कि फोन करते तुला, मग तु ये मला घ्यायला. "

मी:  "हो चालेल, मी वाट पाहिन तुझ्या फोनची".

तिने ऑलरेडी ऑफिसला दोन दिवसाची रजा टाकली होती. मी हि तसंच केलं. अर्थात आपल्या आवडत्या मित्र मैत्रिणींसोबत हवा तेवढा वेळ व्यतीत करायला कुणाला नाही आवडत? ती येणार म्हणून माझंही मन आतून "डांसिंग डांसिंग " करत होतं. मी घरी तिच्या येण्याविषयी कळवलं होतं. घरच्यांची तशी काहीच हरकत नव्हती.

रात्री ९. १५ च्या सुमारास तिचा फोन आला.

ती :  "मी ट्रेनमधे बसलीये तु स्टेशनला येऊन थांब".

मी लगोलग निघालो. स्टेशनहून तिला पिक अप केलं आणि मग टॅक्सीने थेट घरी. घरीपण तिचं यथायोग्य स्वागत झालं. जेवणं आटोपली होती. आज गॅलरीतच बसून थोड्या

गप्पा मारल्या. ती ही थकली असणार. ऑफिसचं काम, तिथून घरी मग तिच्या घरून पुन्हा माझ्या घरी.

मी : "थकली असशील आज लवकर झोप.

उद्या बोलू निवांत. दुसर्या दिवशी पहाटेच मॉर्निंग वॉकला गेलो. तिथेच विचारलं,

मी : "आजचा दिनक्रम कसा काय आखायचा?

ती : " काही नाही मी आलीये ना. आज तुझ्या आईला स्वयंपाकघरातून आराम. "

ठरल्याप्रमाणे सकाळचा चहा- नाष्टा आणि दुपारचं जेवण तिच्याच हस्ते. जेवून थोडा आराम केला आणि मग संध्याकाळी माझ्या बहिणीच्या घरी. तिला तसं आधीच कळवलं होतं. "म्हटलं आपल्या नेहमीच्या ठरलेल्या हॉटेलात जाऊ जेवायला. ती म्हणाली, " नको" मी ह्यांना येताना चिकन घेऊन यायला सांगते. आज घरीच जेवू एकत्र ". जेवण होईपर्यंत छोट्या भाच्यासोबत खेळलो दोघेही आणि मग रात्रीचं जेवण आटोपून पुन्हा घरी. बहिणीच्या आणि माझ्या घराचं तसं चालत अंतर अर्धा तासाचं. तिला म्हटलं चालतच जाऊ, तितकाच एकमेकांसोबत जास्त वेळ घालवता येईल. " हो चालेल कि"- ती म्हणाली. अशाच इकडच्या तिकडच्या गप्पा, मारत कधी घराजवळ येऊन पोहोचलो कळलच नाही. पोटभर जेवण आणि चालण्याचा व्यायाम झाल्याने आजही लवकरच झोपलो. मग पुन्हा दुसर्या दिवशी पहाटे नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉक आणि मग चहा नाष्टा आटोपून. लवकरच दादरला गेलो शॉपिंगसाठी. तसं तिला दादर अजिबात आवडत नाही. बराच गजबजाट आणि गर्दी असल्याने. तरीही माझ्यासोबत आज ती आली. उन्हं डोक्यावर चढायच्या आतच शॉपिंग आटोपून. जवळच्याच श्री. शिवाजी मंदिरात दुपारचं नाटक पाहिलं. दुपारचं जेवण बाहेरच. नाटक संपल्यावर माझ्या आवडत्या बागेत गेलो समुद्र किनार्यालगत. तिथे बराचसा वेळ सोबत घालवल्यावर मावळत्या सूर्यनारायणाचं दर्शन घेऊन आस्वादच्या मिसळीवर ताव मारला. आणि पुन्हा रात्री जेवायला घरी.

ती आल्यापासून घरी रोज जेवणात तिच्याच आवाडिचा बेत. आज भरपूर हुंदडलो होतो. तरीही रात्रीचं जेवण आटोपून तिला आवडतं म्हणून गच्चीवर शतपावली करायला गेलो. आकाशात मस्त चांदणं पडलं होतं. गप्पा सुरु होत्याच नेहमीप्रमाणे. तितक्यात तिचा फोन खणखणला.

आई :"आम्ही उद्या पहाटेसच निघतोय गावाहून, दुपारपर्यंत पोहचू घरी. तु घरी ये लवकर आणि सर्व आटपून ठेव ".

तिने फोन ठेवला आणि माझ्याकडे खिन्न नजरेने पहात म्हणाली.

ती : "आईबाबा येतायत. निघावं लागेल उद्या पहाटे लवकर. "

तिच्या तोंडून हे ऐकताच दोन दिवस सोबत घालवलेल्या क्षणांचा फ्लॅशबॅक चटकन डोळयासमोरून सरकला. कधी नव्हे तो आसवांनी डोळयांच्या किनार्यावर गर्दी केली. माहित नाही का पण हे क्षण सरुच नये असं आज वाटत होतं. गप्पांच्या ओघात मनाने फार जवळ आलो होतो. हो पण मैत्रीच्या सीमा राखूनच. तिच्यासाठीही ते क्षण सुखद होते. पण नाईलाज होता. जावं तर लागणार. आभाळातल्या चंद्राकडे पहात मनोमनच त्याला विनवलं.

मी : "बाबा रे आजची रात्र मावळतीला थोडा उशीर केलास तर नाही का रे चालणार? हवे तर आजच्या रात्रीचा ओवरटाईम घे माझ्याकडनं हवा तेवढा. पण आजची रात्र थोडा उशीराच मावळ. तिच्यासोबत अजून थोडे क्षण जगायचेत मला". -©चंदन विचारे (सहज सुचलेलं)

---

## 3} तो ती आणि चांदण रात्र :

" तुला आठवते ती रात्र? अगं असं काय करतेस.. आपण गावी गेलो होतो. तु आणि मी अंगणात गप्पा मारत बसलो होतो आणि मी अचानक... हा हा तीच ती रात्र. नुकतीच जेवणं आटोपली होती. भांडीकुंडी आवरुन तू अंगणात आलीस. मला म्हणालीस "चल ना थोडी शतपावली करुया". मी म्हणालो "नको, त्यापेक्षा ईथेच बस माझ्या शेजारी. मस्तपैकी गप्पा मारुया. " तु म्हणालीस "वा आज मुड छान दिसतोय स्वारींचा". ठीक आहे, मी मारेन गप्पा पण एक अट आहे माझी. आज आपण दोघांनीही झोपायचं नाही. भरपुर गप्पा मारायच्या जोवर हा चंद्र मावळत नाही तोवर. चालेल? " मी म्हटलं " हो कबूल. " घरासमोर छान शेणानं सारवलेलं अंगण. अंगणातलं तुळशी वृंदावन, आभाळत पडलेलं टिप्पूर चांदणं, चंद्राची ती लोभसवाणी कोर, समोर कुंपणापलीकडे करवंदाच्या जाळीत चमकणारे काजवे अन आजूबाजूचं शांत भारुन टाकणारं वातावरण. सारंच कसं छान वाटत होतं. माझा हात तुझ्या हातात होता. माझ्याऐवजी आज तूच बोलत होतीस अन मी मंत्रमुग्ध होऊन एकटक तुझ्याकडे पहात होतो. तु काय बोलतेस याकडे लक्ष नव्हतच माझं मुळी. तुझं रुप न्याहाळण्यातच दंग झालो होतो मी.

थोडा वेळ झाला कि, तु मधेच मला विचारायचीस "काय रे, ऐकतोयस ना तू मी काय म्हणतेय ते? ". मी गालातल्या गालात हसत हलकेच मानेने होकार द्यायचो. मग तु पुन्हा सुरु व्हायचीस. असेच काही तास गेले असतील. अन मग मी अलगद तुझ्या कुशीत येऊन विसावलो. तुलाही ते आवडलं होतं. तू एकटक चंद्राकडे पहात मला इकडच्या तिकडच्या गोष्टी सांगत होतीस. तुझी मऊ मुलायम बोटं हलकेच माझ्या केसांतून फिरत होती. अन तुझ्या केसांतून फिरणार्या हळूवार बोटांनी अशी काही जादू केली कि माझं मलाच कळलं नाही कि मी केव्हा झोपी गेलो ते. मी झोपी गेलोय हे कळल्यावर तू चिडली असशील माझ्यावर. बोलली असशील, " हे रे काय, अजून बरीच रात्र सरायची बाकि आहे. तो बघ तो चंद्रही मावळला नाही अजून.

"पण खरं सांगू चंद्र केव्हाच मावळला होता आभाळात. नव्हे तो तुझ्या कुशीत येऊन निजला होता.. ©चंदन विचारे. (सहज सुचलेलं)

---

**4} <u>निवांत</u> :**

समोर अथांग पसरलेला सागर. बंगलोच्या लौनमधुन स्पष्ट दिसतोय. मला स्पष्ट ऐकु येतेय त्याच्या लाटांची गाज. पलीकडे डोंगराआडून सूर्यदेव डोकावुन पहातोय. जागा होतोय तोही हळूहळू , पांढऱ्याशुभ्र ढगांची चादर बाजूला सारून. त्याच्या येण्याने आभाळाला मस्त नारिंगी रंगाची किनार लाभलीये. एका बाजूला डोंगराआडून उगवणारा सूर्यनारायण, समोर नारिंगी रंगाचं आभाळ, त्याखाली विसावलेला अथांग समुद्र आणि दुर्सच्या बाजूला सागराकडे आपली पाठ वळवून बसलेला कोर्लईचा किल्ला. सुर्याची कोवळी किरणं न्हाऊ घालतायत अवघ्या निसर्गाला. हळुच कुठुनशी पाखरांची किलबिल ऐकु येतेय.

अशातच हिरवळीवर बसलेली तु अन तुझ्या कुशीत निजलेला मी. डोळे अजूनही पेंगतायत. आळोखेपिळोखे देत मीही जागा होऊ पाहतोय. पण तुझ्या कुशीतून बाहेर यावंसच वाटत नाही. तुझी नाजूक बोटं हलकेच माझ्या केसांतुन फिरतायत. अन मी हि हळुहळु त्या अथांग पसरलेल्या सागरासम शांत शांत होतोय.. माझीही अवस्था अगदी या समोरच्या समुद्रासारखी झालीये. वरवर शांत भासतोय खरा. पण आत खोल (मनाच्या) तळाशी बरीच उलथापालथ सुरु ये विचारांची. तिला शांत करण्यासाठीच आज तुझ्या कुशीत येऊन निजलोय. नाहीतरी एरवी हा निवांतपणा माझ्या वाट्याला येतोच कुठे. सदानकदा भटकंतीवर असणारा मी आज तुझ्या कुशीत येऊन निजलोय म्हणुन तु हि खुशीत असशीच. हो ना? नाहीतरि मी ही तुझ्या वाट्याला फारसा येत नाहीच. म्हणुनच सांगतो आजचा हा क्षण अगदी भरभरुन जगुन घे

-©चंदन विचारे. (सहज सुचलेलं)

---

## 5} पहिल्या पावसाची चिंब ओली आठवण :

मे महिन्याची अखेर. दोघेही ऑफिसमधून सुट्ट्या घेऊन आपआपल्या गावी उन्हाळी सुटी एंजॉय करायला गेलेले. गावी आपआपल्या भावंडांसोबत, मित्रमंडळींसोबत रानात हुंदडणे, नदीवर पोहणे, गप्पा, आणि खायला आंबे, काजू, फणस, करवंद अशा रानमेव्यांची मेजवानी असा ठरलेला दिनक्रम. तसं नाही म्हणायला दोघेही इथे रुळल्यासारखे भासवत होतेसगळयांना पण मनातनं दोघांनाही एकमेकांची ओढ. केलेंडरवर रोज दिवस मोजण्यात जात होते. कधी एकदाची सुटी संपतेय असं झालेलं. चेहर्यावर फक्त ते दिसू देत नव्हते. कारण उगा नातेवाईकांना चर्चेचा विषय नको. प्रेम नवखं असलं कि एकमेकांविषयीची अनामिक ओढ, भेटीची हूरहूर हे आलंच. झालं एकदाचं मनासारखं. सुट्या संपवून दोघेही मुंबईला परतले. आता मात्र दोघांच्याही चेहर्यावर आनंद होता. कधी एकदा एकमेकांना भेटून गावच्या गमतीजमती सांगतोय असं झालेलं. तसं व्हॉटसअपवर, फेसबुकवरनं रोज सेल्फि अन फोटोज पोस्ट करणं सुरु होतच. फोनवर जास्त बोलता येत नव्हतं इतकच. हा म्हणजे बोलायचं झालंच तर लपूनछपून.

सोमवारचा दिवस उजाडला. दोघेही आपआपल्या कामावर रुजू. मेलबॉक्स नुसता गदागद भरलेला. पहिला दिवस मेल्स चेक आणि रिवर्ट करण्यात गेला. रात्री व्हॉटसअपवर बेत ठरला. उद्या काही करुन भेटायचच. दुसर्या दिवशीची संध्याकाळ. "हॅलो ऐक ना निघालीस का? ती- हो रे बाबा निघालीये. कुठे भेटायचं तेवढं सांग".

तो - "कुठे म्हणजे आपल्या नेहमीच्या ठिकाणी. दादरला सुविधाजवळ भेट. "

ती- "अच्छा मी पोचते थोड्या वेळात तु ये लवकर". नेहमीप्रमाणे तो वेळेआधी आणि सवयीप्रमाणे ती जरा उशीराच पोचली. ह्याची इथे जाम चिडचिड सुरु झालेली. "येऊ दे दाखवतोच ईंगा, हिचं नेहमीचंच झालय. वेळेवर यायचं ठाऊकच नाही. ईतक्यात मॅडमची एंट्रि झाली.

तो- "या आज किती मिनीटं उशीर केलात यायला"?.

ती- :अरे सॉरी रे. आज नेमका कधी नव्हे तो निलूने शॉपिंगचा बेत आखला. कसंबसं चकवत आलेय".

तो- “बरं बरं, चल लवकर बागेत. पावणेसात झालेत तासभर तरी बसू आणि मग निघू".

गप्पा टप्पा मारत दोघे बागेजवळ पोचले. तिथे येताच त्याने बेत बदलला.

तो- " ऐकना, मला ना आज वाळूत बसावसं वाटतय, गाज ऐकायची समुद्राच्या लाटांची जवळून. आपण पलीकडे जाऊया न".

ती- "हे काय आज अचानक? , बरं चल. किती चालवतोस तू... पोचलो ना चल आता बसूया एकदाचं ".

तो - "दोन मि. अशीच उभी रहा ना".

ती- आता हि काय नविन टूम? ".

तो- "तू रहा ना अशीच सांगतो. "असं म्हणत त्याने तीला चटदिशी आपल्या मिठीत ओढलं. सूर्य मावळला होता. चंद्र हळूहळू ढगाआडून बाहेर येत होता. चांदण्यांनीसुद्धा आभाळात टिमटिमायला सुरुवात केली होती. मस्त गार वारा सुटला होता. लाटांचा संथ गाज ऐकू येत होती. अंधार बर्यापैकि पडल्याने त्या दोघांना आता कुणालाच सहज ओळखता येणार नव्हतं. बर्याच दिवसांचा विरह या मिठीत निवळला होता. तीही हलकेच साखरेसारखी विरघळली त्याच्या मिठीत. स्वर्ग काय म्हणतात. तो तिला त्याच्या मिठितच गवसला होता आज.

ती- "चल पुरे आता सोड ना. मला बोलायचय तुझ्याशी थोडं ".

तो-"थांब ना ".

ती – “मला बोलायचय न पण".

तो - "बोला काय बोलायचय ते. काय काय मजा केली गावी? मजा कसली तुझ्याविना करमतच नव्हतं. कधी एकदा तुला भेटतेय असं झालेलं".

तो- “माझीही अवस्था तुझ्यापेक्षा वेगळी नव्हती".

ती- “ऐक ना, बाबांनी गावी माझ्यासाठी स्थळं बघायला सुरुवात केलीये. मी नविनच काम आहे. आधी परमनंट तर होऊ द्या. असं म्हणून आजचं उद्यावर ढकलून आलेय. पण फार नाही टाळता येणार मला. तु काही तरी कर न. बाबांशी येऊन बोल ना".

तो – “ठिक, बोलतो. आधी इंक्रिमेंटचं काय ते होऊ दे".

ती – “बघ काय ते लवकर. गावाकडच्या गप्पा आणि भविष्याची स्वप्नं रंगवता रंगवता एक तास लोटल्याचं कळलंच नाही दोघांना.

ती- "बापरे ! सव्वाआठ वाजले. आज पुन्हा उशीर होणार घरी जायला. पुन्हा नविन बहाणा करावा लागणार काहीतरी. शी बाबा".

तो - "ओह शीट ".

ती-" काय झालं". वॉव, ढग भरुन आलेत, मस्त पाऊस पडणार आता, चल न भिजुया आज पावसात. पहिला पाऊस आहे".

तो- "नाही नको, माझ्या बॅगेत डॉक्युमेंट आहेत अॉफिसचे आणि मोबाईल, पर्स, चार्जर वगैरे भिजेल ".

ती-" काही भिजत वगैरे नाही. माझ्याकडे पिशवी आहे. त्यात नीट पॅक कर सगळं"

. हे सगळं बोलत असतानाच पावसाने बरसायला सुरवात केली. मस्त पडला. दोघांनाही अगदी चिंब भिजवून गेला. अशावेळी तिच्या भिजलेल्या ओठांच्या गुलाबी पाकळयांनी त्याला खुणावलं नसतं तरच नवल. ती ही त्याला आज नकार द्यायच्या मुडमधे नव्हती. दोघांनीही भिजलेल्या ओठांनी ओठांची तृषा भागवली. अन निघाले दोघेही चिंब ओल्या कपड्यांनी. पहिल्या पावसाची चिंब ओली आठवण घेऊन-©चंदन विचारे. (सहज सुचलेलं)

---

## 6} <u>चाळवाली लव्ह स्टोरी</u> :

नुकतेच गणपती बाप्पा येऊन गेले होते. त्यामुळे आता सचिनला आराम होता. श्रमपरिहार म्हणून दोन दिवस ठाण्याला मावशीकडे राहून आला होता. सचिन म्हणजे चाळीतला तरुण तडफदार कार्यकर्ता. चाळीतला कुठलाही उत्सव असो, सण समारंभ असो किंवा एखादा दुःखद प्रसंग. सचिन सगळीकडे सेवेसाठी तत्पर. त्यामुळे सचिन चाळीतल्या सगळयांचाच लाडका. पठ्ठ्या भारीच हुशार. गणेशोत्सवानिमित्त चाळीत आयोजित केलेले नाटक असो, समुह नृत्य असो. सगळयात ह्याचा सक्रिय सहभाग. सचिनच्या घरी आई बाबा आणि सचिन हे तिघेच. मोठी बहीण लग्न करुन सासरी सुखात नांदत होती. बाबा प्रिंटिंग प्रेसमधे कामाला. आई गृहिणीच. सचिन पहाटे पेपरची लाईन टाकायचा. जवळच्याच एका प्रायव्हेट लि. कंपनीत वडीलांनी वशिल्यावर क्लार्कच्या पोस्टवर चिटकवलं होतं.

नेहमीप्रमाणे आजही सचिन पहाटे लवकर उठून प्रातःविधी उरकण्यासाठी म्हणून निघाला. वर गंजी आणि खाली बरमुडा. नुकताच झोपेतून उठल्याने केस विस्कटलेले. हातात चिंपाट घेऊन स्वारी दार उघडून घराबाहेर पडते तोच समोरच्या गॅलरीत एक ऐन विशीतली सुंदर नार फुलाफुलांची डिझाईन असलेली मॅक्सि घालून दात घासत उभी. ह्याला या अशा अवस्थेत एकदम समोर पाहून तीही जरा बावचळीच. सचिनला तिने ह्या अवस्थेत पाहिल्यामुळे याची अवस्था तर मेल्याहून मेल्यासारखी. पार तोंड उतरलं होतं राव. मागे फिरुन अर्थ नव्हता अन पुढे जाण्याशिवाय दुसरा पर्याय. पठ्ठ्या नजर चुकवीत एकदाचा चाळीतल्या सार्वजनिक शौचालयात गेला. आत गेल्यावर डोक्यात विचारचक्र दौडू लागली. आयला हि म्हणायची तरी कोण? कधी आली? कुणाकडे आली? कुणीका असेना पण दिसायला जाम भारी राव. पाहताक्षणीच सुंदरा मनामध्ये भरली. तिलाही सचिनला अशा अवस्थेत पाहून हसु आलं खरं पण आधी तिने आवरलं स्वतःला. साहेब घरी येताच आईवर प्रश्नांचा भडीमार सुरु. "आई समोरच्या खोलीत कोण आलंय गं? " आई- "का रे? हो म्हणजे कालच एक नविन बिर्हाड आलय रहायला समोरच्या खोलीत ". सचिन - नाही असंच आपलं. चाळीत काय काय घडतं याची महिती असायला हवी ना म्हणून विचारलं.

चाळीत नवीन पाखरू आल्याची बातमी एव्हाना वणव्यासारखी पसरली होती. आता चाळीतल्या बहुतांश तरुण पोरांनी आपआपल्या परीने मोर्चेबांधणी करायला सुरुवात केली

होती. यात आघाडीवर आपले सचिनरावच. प्रश्नच नाही म्हणा. काय  आहे आपल्या या लव्ह स्टोरीचा हिरो आहे ना तो.  सचिनने आपलं हेरखातं कामाला लावून  तिच्याविषयीची सगळी माहिती गोळा केली. जन्मस्थळ, जन्मवेळ ते अगदी कुठल्या  कॉलेजात? कुठल्या वर्षाला? कुठल्या शाखेत शिकते इथपर्यंत. आता तिच्यामागोमाग वेळ मिळेल तश्या याच्याही कॉलेजच्या फेर्या वाढायला लागल्या. तिच्याही ते लक्षात आलं होतं पण तिने तसं काही दाखवलं नाही. गेले दीड - दोन महिने तिच्या नजरेला नजर भिडवणं, तिला हलकेच स्माईल देणं, तिच्याशी बोलण्याची फुलटू ट्राय हे सगळं सुरु होतं. " साला खूप झालं आज काही करुन भिडायचच म्हणून मनाची पुर्ण तयारी करुन छानपैकि टि शर्ट -जीन्स, डोळयावर डुप्लीकेट रेबनचा गॉगल लावून, सायकलवर बसून कॉलेजच्या गेटबाहेर तिच्या येण्याची वाट पहात सचिनराव सज्ज. लेक्चर संपवून ती मैत्रीणींसोबत बाहेर आली. याने नाक्यावरच्या हारवालीकडनं लालेलाल ताजा टवटवीत  गुलाब आणला होता. ती गेटमधून बाहेर निघाल्यापासून ते तिच्या सोबतच्या सर्व मैत्रीणी कटेपर्यंत ह्याचा पाठलाग सुरुच. आता ती एकटिच होती हे पाहून पठ्ठ्या जराही वेळ न दवडता डायरेक्ट भिडलाच.

"अंजू आय लव यू". माझं खुप प्रेम आहे तुझ्यावर". वगैरे डायलॉग बाजी झाली. तसाही चाळीतल्या नाटकात भाग घेत असल्यामुळे पठ्ठा डायलॉगबाजीत तरबेज. तिला हे सारं इतक्या लवकर घडेल याची जराही कल्पना नव्हती. त्यामुळे ती हि जराशी बावरुनच गेली. तिनेही मग त्याला एक डायलॉग चिटकवलाच,   " मला विचार करायला थोडा वेळ हवाय".  "चालतय कि, तुला हवे तेवढा वेळ घे. "असं म्हणून खुशीतच सचिन घरी आला. अंजलीनेही फावल्या वेळात ह्याची सगळी माहिती काढून घेतली. मग हळूहळू एकमेकांच्या घरी  काहीना काही निमित्त करत फेर्या सुरु झाल्या. अंजूनेपण सचिनच्या आईवर फुल टू इंप्रेशन मारायला सुरुवात केली होती. सचिनला तसं नकार देण्यासारखं  काहीच कारण नव्हतं. आता रोज ठरलेल्या वेळी दोघे गॅलरीत  येत. एकमेकांना नजरेने इशारे करणं. चाळीतल्या कुणालाही कळू न देता एकामागे एक अशा थोड्याफार फरकाने बाहेर भेटू लागले. कधी बागेत तर कधी चौपाटीवर. दिवासामागून दिवस जात होते. प्रेमाला चांगलाच  रंग चढू लागला होता. एव्हाना यांच्या प्रेमप्रकरणाची कुणकुण चाळीतल्यांना लागली होती. तशी ती अंजलीच्या घरच्यांनाही लागली. मग काय फिल्मीस्टाईलने आधी घरच्यांनी विरोध केला खरा. कॉलेजला जाणं बंद, घराबाहेर पडण्यावर बंदी वगैरे. मग चाळीतल्याच एका वयोवृद्ध काका काकूंनी मध्यस्थी करुन तिच्या घरच्यांची

समजूत काढली. मग ठरलं एकदाचं. अंजलीचं शिक्षण पुर्ण होताच. दोघांचं लग्न उरकायचं. टि. वाय ची परिक्षा संपायचीच बाकि होती. मग काय घरच्यांनी परवानगी दिली म्हटल्यावर आता मात्र चाळीतले हे लपतछपत भेटणारे लवबर्ड एकमेकांना उघडउघड भेट लागले. भविष्यातल्या सोनेरी संसाराची स्वप्नं सजवू लागले.

सारं काही व्यवस्थित सुरु होतं. आणि एक दिवस पहाटे सचिन नेहमीप्रमाणे पेपर टाकायला गेला तो नेहमीच्या वेळेत परतला नाही. आज एवाढा उशीर का म्हणून सचिनची आईही काळजीत होती. बाबांची प्रेसमधे जायची गडबड सुरु होती. ईतक्यात पेपरवाल्याने सचिनच्या घरी गोट्याकडून निरोप पाठवला. सचिनला गाडीने धडक दिली. नशिब बलवत्तर म्हणून थोडक्यात बचावला. पायाला गंभीर दुखापत झाली होती. रिकवरीसाठी बराच वेळ लागणार होता. सचिन हॉस्पिटलमधून घरी आला खरा पण हातात कुबड्या घेऊन. चाळीतल्या सगळयांनीच दोन्ही घरांना या काळात बरच सावरलं. अंजलीही सचिनच्या पाठीमागे ठामपणे उभी राहिली. सचिनचा गमावलेला आत्मविश्वास तिने हरतहैने परत मिळवून द्यायचा चंगच बांधला होता. धडपड्या सचिनला हे असे अनाहूतपणे आलेले अपंगत्व सहन होत नव्हते. त्याचीही चिडचिड व्हायची. मधल्या काळात अंजलीच्या नातेवाईकांनी तिला नी तिच्या घरच्यांना दुसरीकडे स्थळं पहाण्याविषयी सुचवले पण अंजली काही केल्या तयार नव्हती. परिक्षा संपल्या होत्या. अंजलीकडे आता वेळच वेळ होता. जास्तीत जास्त वेळ आता ती सचिनसोबत घालवत होती. सचिननेही नैराश्याच्या भरात तिला घरच्यांच्या मर्जीने दुसरीकडे लग्न करण्याविषयी सुचवून पाहिले. पण अंजली तिच्या निर्णयावर ठाम होती. डॉक्टरांनी सांगितलेले व्यायाम ती सचिनकडनं करुन घेत होती. औषधोपचार सुरु होतेच. त्याचा गमावलेला आत्मविश्वास तिने त्याला परत मिळवून दिला. वर्षभराच्या नियमित उपचारांनंतर आता सचिनची पाऊलं कुबड्यांशिवाय पडू लागली. कालांतराने अंजलीने सचिनच्या घरच्यांच्या मदतीने त्याला यातून पुन्हा स्वतःच्या पायावर विनाआधार उभं केलंच. मग काय सचिन आता कुबड्यांशिवाय उभा राहिला होता तोही लग्नाच्या मंडपात. अंजलीचा आणि सचिनचा देवाब्राम्हणांच्या आणि चाळकर्यांच्या साक्षीने शुभविवाह सोहळा पार पडला. दोघेही आता सुखाने नांदू लागले होते. मंडळी संकटं कुणावर येत नाही. पण अशा या संकटसमयीच प्रेमाचा खरा कस लागतो. या सगळयावर मात करत यातून तळपून लख्ख चकाकत बाहेर निघतं तेच खरं प्रेम. अगदी बावनकशी सोन्यासारखं. ©चंदन विचारे.

---

**7} <u>नारळी बाग</u> :**

सीएसटीहून सव्वा पाच ची ठाणे स्लो लोकल पकडून त्याने दादर गाठलं. स्टेशनवर उतरताच गर्दीतून वाट काढत तो चालला होता. घाई होती ती सूर्यास्ताआधी आपल्या आवडत्या ठिकाणी पोहोचायची. तो तिथे वरचेवर येत असतो एकटाच. त्याला काही नवीन लिहायचं असलं कि. आजही तो आला अन मोक्याची जागा पकडून बसला. बॅगेतून डायरी काढली आणि क्षितिजाकडे डोळे लावून काहीतरी आठवायचा प्रयत्नात. सवयीप्रमाणे नखे कुर्तडणं सुरु होतंच. काही सुचत नसलं कि हा त्याचा आवडता उद्योग. बऱ्याच जणांनी सांगून पहिलं कि अरे सोड हि सवय. काय ते बरं दिसतं का?. पण पठ्या ऐकेल तर शपथ.

समोर अथांग पसरलेला सागर. किनार्याशी पाठशिवणीचा खेळ खेळणाऱ्या लाटा, थव्याने आपापल्या घरट्यांकडे परतणारी पाखरं, त्या लाटांची ती ऐकतच राहावं अशी वाटणारी गाज, सागराच्या मधून वाट काढत वांद्रे -वरळीला जोडणारा सागरी सेतू. त्यावरून सुसाट वेगाने धावणाऱ्या गाड्या. लांबून पाहताना अगदी खेळण्यातल्याच आहेत असा भास व्हावा. क्षितीजाच्या दिशेने वाटचाल करणारा तो पिवळा धम्मक सूर्यगोल. तो जसजसा खाली खाली उतरत जातो तसतश्या आभाळात पिवळसर सोनेरी रंगाच्या छटा पसरताना दिसतात. फार मनमॊहक वाटतं ते दृष्य. तो सोनेरी रंग पसरलेला पहायला खूप छान वाटतं. गार वारा सुटलेला असतो. त्याच्या झोताने नारळीच्या झावळया सळसळत असतानाचा आवाजहि लक्ष वेधून घेतो. मंत्रमुग्ध होऊन जावं असं अवतीभवतीचं वातावरण. अगदी शांत समाधी लागावी असंच.

बागेच्या मध्यभागी एक घुमटाकार छत्री आहे. तिच्याच छत्रछायेखाली येऊन काही हवशी नवशी कलाकार मंडळी आपली कला सादर करत असतात. कुणी आपले नृत्याविष्कार सादर करत असतं तर कुणी हाती गिटार घेऊन गाणी गुणगुणत असतं. आजही एक वाद्यवृंद तिथे आपली कला सादर करण्यासाठी दाखल झाला होता. ते मराठी, हिंदी गाणी सादर करत होते. बागेत बसलेले प्रेक्षकही त्यांना भरभरून दाद देत होते. प्रेक्षक म्हणजे, कुणी आपल्या बॉयफ्रेंडसोबत आलं होतं, कुणी आपल्या गर्लफ्रेंडसोबत, कुणी मित्रमंडळींसमवेत तर कुणी आपल्या बायकोसोबत आणि कुणी आपल्या लहानग्या बच्चेकंपनीला घेऊन आलेले असे ते प्रेक्षक.

आमंत्रित असं कुणीच नाही. तो हि त्यांच्यापैकीच एक. बागेत बसलेली बहुतांश मंडळी गाणी ऐकण्यात गुंग तर या पठ्याची नजर मात्र आभाळाकडे सूर्यास्ताची वाट पाहण्यात दंग.

इथे येणाऱ्या प्रत्येकाची इथे येण्यामागची कारणं वेगवेगळी असतात. कुणी भविष्याची सोनेरी स्वप्ने रंगवायला येतं, कुणी प्रेमाच्या गुजगोष्टी करायला, कुणी आपल्या लहानग्यांना झुल्यावर झुलवायला, कुणी आपल्या दुःखाला वाट मोकळी करून द्यायला तर कुणी घरी प्रायव्हसी मिळत नाही म्हणून ज्या गोष्टी घरी बोलता येत नाही त्यांवर चर्चा करायला, आणि त्याच्या सारखा वेडा काही सुचावं म्हणून आणि नाहीच काही सुचलं तरी इथला किनाऱ्यावरचा सूर्यास्त पाहून समाधान मानायला. कुणासाठी हि जागा म्हणजे नुसतच विरंगुळयाचं ठिकाण, कुणासाठी हक्काच्या मित्रमंडळींना भेटण्यासाटीचा कट्टा तर कुणासाठी आठवणींचा हिंदोळा. आजही तो आला होता काही नवं सुचतंय का ते पाहायला पण काही सुचलंच नाही म्हणून तसाच मावळणाऱ्या सूर्यनारायणाला दंडवत घालून निघाला. हो कारण तो मावळणारा सूर्य जाता जाता त्याला काहीतरी नक्कीच देऊन जातो. - © चंदन विचारे. (सहज सुचलेलं)

---

## 8} <u>कॉंट्रेक्ट मॅरेज - करार प्रेमाचा</u> :

निशा- "वा किती छान वाटते ना हि मुंबई रात्रीच्या वेळेस. स्ट्रीट लाईट्सच्या उजेडात हिचं हे रुप किती सुंदर वाटतं. वारासुद्धा किती गार सुटलाय, लाटांचा पण किती मस्त आवाज येतोय. नुसतं ऐकत रहावसं वाटतं. १२. ३० वाजून गेलेत रात्रीचे. सगळे झोपायच्या तयारीत असताना आपण दोघे वेड्यासारखे चौपाटिवर बसून हे असं आईसक्रिम खातोय. सो सिली ना?

राहूल- "हो. "

निशा - "तू का आज असा शांत शांत, बोल ना काहीतरी ".

राहूल- "नाही नको, आज तुच बोल मी नुसतं ऐकतो".

निशा- " एक विचारु? "

राहूल - "विचार ना ".

निशा- "आज काही खास आहे का? नाही म्हणजे तू आज मला संध्याकाळी ऑफिसमधून सुटताच शॉपिंगला घेऊन गेलास तिथून आपण कँडल लाईट डिनर

आणि आता ईथे चौपाटिवर हि आईसक्रीम ट्रीट, तुझं प्रमोशन वगैरे झालंय का?

राहूल- "नाही".

निशा- "मग हे सारं आज अचानक असं का, कशासाठी? आज तू एकामागोमाग एक सरप्राईज देतोयस मला म्हणून विचारलं".

निशा प्रश्नार्थक नजरेने राहूलकडे पहात होती. राहूलला आता काय बोलावं काही सुचेचना. तिच्या या प्रश्नाने राहूलच्या डोळयांच्या काठावर अचानक पाणी तरळू लागलं.

निशा- "हे काय तुझ्या डोळयात पाणी? काय झालय राहूल काही सांगशील का. नाही म्हणजे संध्याकाळपासून तु मस्त रोमेंटिक मुडमधे होतास अन आता हे असं

इमोशनल? बोल ना काहीतरी प्लीज".

राहूल- "सकाळी ऑफिसला पोहोचलो अन तितक्यात जोशी वकिलांचा फोन आला ".

निशा- "बरं मग? "

राहूल- "निशा आजची रात्र हि आपल्या दोघांच्या एकत्र आयुष्यातील शेवटची रात्र".

निशा- "मला कळेल अशा भाषेत सांगशील. सारं अगदी खरं आणि स्पष्ट शब्दांत".

राहूल- "निशा आपल्या कॉंट्रेक्ट मॅरेजला उद्या एक वर्ष पूर्ण होतय".

निशा- "व्हॉट? मला कळलंही नाही. आय मीन काळ इतका जलद गतीने सरला कि... यु मीन टू से उद्यापासनं आपण दोघंही आपआपल्या घरी? आणि घरी काय सांगायचं? हे सगळं इतक्या लवकर होईल असं वाटलं नव्हतं मला. मला तर काहीच सुचतच नाहीये राहूल. घरच्यांना काय सांगणार आहोत आपण? हे सगळं ऐकून ते काय विचार करतील आपल्याबद्दल? नाही म्हणजे मला ठाऊक आहे आपल्या दोघांचही आधीच सगळं ठरलं होतं पण आता... ? "

राहूल - "जे होईल ते भोगायची मी तयारी केलीय मनाने. तुझ्या नी माझ्या घरचे माझ्याबद्दल काय विचार करतील मला ठाऊक नाही पण जे काहि होईल त्याला एकत्रितपणे सामोरं जायची तयारी आता आपण करायलाच हवी".

निशा- "अच्छा म्हणजे संध्याकाळपासून आतापर्यंत तू जे काही केलस मी त्याला तुझं माझ्यावरचं प्रेम समजत होते. मला वाटत होतं कि तुला मी आवडायला लागलीये, तू ही गुंतत चाललायस माझ्यात. पण हे सगळं... हे सगळं काय होतं राहूल?

राहूल- "तू याला काही म्हण मी मात्र या क्षणांना अधिक संस्मरणीय कसं करता येईल याचा विचार करत होतो". खरं तर हे काँट्रेक्ट मॅरेज करण्याआधी मला हे लग्न वगैरे मुर्खपणा वाटायचा. नको होतं मला हे सारं. तो संसार, त्या जबाबदाऱ्या, मोकळं एकटं रहायची सवय झाली होती. कुणाचंही बंधन नाही, कसली अडवणूक नाही. मनाला येईल तसं वागायचं, भटकायचं, खायचं प्यायचं नुसती मज्जानी लाईफ. घरच्यांची ईच्छा मोडवत नव्हती त्यात आई ईरेला पेटलेली म्हणून या भानगडित पडलो खरा. पण आताशा हि भानगड हवीहवीशी वाटू लागली होती. तुझं माझ्यासोबत असणं, तुझं हसणं, तुझं रडणं, रुसणं आता कुठे आवडू लागलं होतं. सवय झाली होती तुझी आणि त्यात आज अचानक वकिलांचा फोन... सारंच थांबल्यासारखं वाटू लागलं होतं. आपल्या हातून काहीतरी निसटतय कि काय असं वाटायला लागलं. मग ठरवलं आजचा अर्धा दिवस तुझ्यासोबत घालवायचा. खरं तर पूर्णच पण काही क्लाईंट मिटींग्स होत्या त्या पोस्टपोन करण शक्य नव्हतं म्हणून नाईलाजानेच कसाबसा अर्धा दिवस भरला".

निशा- " राहूल माझी ही अवस्था तुझ्यापेक्षा वेगळी नाही ये रे. खूप प्रॅक्टिकल समजत होती मी स्वतःला पण तुझ्या गोड स्वभावावर कधी भाळले माझं मलाच कळलं नाही. तुझ्या घरच्यांनीही खूप जीव लावला माझ्यावर. बाबांचाह हट्ट होता म्हणून, विचार एकच होते म्हणून मी हि या काँट्रेक्ट मॅरेजसाठी तयार झाले होते पण.. मलाहि आता हे सगळं हवय राहूल. प्लीझ माझं हे सुख माझ्यापासून नको न हिरावून घेऊस. तू तू ना एक काम कर आताच्या आता वकिलांना फोन करून सांग कि आपण.. आपण आता केवळ वर्षभरासाठी नाही तर आयुष्यभरासाठी एकत्र रहाणार आहोत म्हणून. तू फाडून टाक ते काँट्रेक्ट. नाही तर मीच फाडते. कशाला न उगाच आईबाबांना त्रास. त्यांची काय चूक आहे यात? राहूल आपण आयुष्यभरासाठी एकत्र येऊया न प्लीझ ".

राहूल- " हे तू बोलतेयस निशा. नाही म्हणजे तू आधी आपण एक वर्षानंतर वेगळं व्हायचं या मतावर ठाम होतीस". आपलं आधीच ठरलं होतं कि लग्नाला काही महिने झाले कि घरच्यांसमोर आपलं पटत नाही असं घरच्यांना भासवायचं आणि मग वर्षभराच्या आताच घटस्फोट ". पण ठरल्यानुसार आपल्यात तसं काही घडलंच नाही. कुठलाही वाद नाही, हा मतभेद बऱ्याचदा झाले पण ते तेवढ्यापुरते. कदाचित आपल्यात तेवढं अंडरस्टँडिंग असावं. मी

बऱ्याचदा ठरवलं कि मुद्दामहून काहीतरी वाद उकरून काढावा पण कुणास ठाऊक का जमलंच नाही.

निशा- " हो मी मान्य करते कि माझा याला सुरवातीला पाठिंबा होता. खूप विचार करून, प्रॅक्टिकली तु आणि मी दोघांनी मिळून हा निर्णय घेतला होता. पण आता नाही. मला नकोय तो करार वगैरे. मला तुझी सोबत हवीये बस्स ".

खरं तर राहूल आणि निशा या दोघांचेही स्वभाव एकदम भिन्न टोकाचे, राहूल मनमौजी पण हळवा आणि निशा बिंधास्त, रोखठोक, आपल्या मतावर ठाम, प्रॅक्टिकल. लग्न या गोष्टीला दोघांचाही ठाम विरोध. आयुष्य आपल्याला हवे तसं आपल्या मर्जीने जगायचं या एका गोष्टीवर मात्र दोघांचही एकमत. पण तरीही घरच्यांच्या ईच्छेखातर किंवा त्यांच्या इमोशनल अत्याचाराला बळी पडून म्हणा दोघेही लग्न करण्याचा निर्णय घेतात. त्याचाच एक भाग म्हणून एकमेकांना भेटतात. लग्नाला नकार द्यावा असं काहीच ठोस असं कारण न भेटल्यामुळे दोघंही एका वर्षाच्या करारावर एकत्र येण्याचा अर्थात हा कॉंट्रेक्ट मॅरेजचा पर्याय निवडतात. पण आता वर्षभराच्या सहवासानंतर दोघांनाही एकमेकांची पुरती सवय झालेली असते. एकमेकांच्या संमतीने केलेला हा १ वर्षाचा करार आता दोघांनाही नकोसा झाला होता.

कागदावरचा करार केवळ कागदापुरताच उरलेला असतो. कारण आता मनाशी मनाचा प्रेमकरार झालेला असतो. वर्षभरापुरता नाही तर आयुष्यभरासाठी. प्रेम हे असंच असतं. कधी केव्हा कसं होईल नाही सांगता येत. बस होऊन जातं. जसं राहूल आणि निशाला झालं तसं.
©चंदन विचारे. (सहज सुचलेलं)

----------------------------------------------

9}<u>बागेतल्या गप्पा :</u>

ती तुला नीट बोलताच येत नाही का रे" :? "

तो काय झालं " :? "

ती म्हणजे हे असं तुसड्यासारखं बोलण्याची देणगी तुला वारसाहक्काने लाभलीये कि नाही" : ह्या घराण्यात तूच असा वेगळा जन्माला आलास ? "

तो " .बास हा हे जरा अति होतंय " :

ती स्वतःला बोलल्यावर कसं झोंबतं " :. मी मघापासून एवढं प्रेमाने बोलतेय तुझ्याशी तर तुझं आपलं तुसड्यासारखं बोलणं सुरूच आहे. "

तो सॉरी" :, मी जरा वेगळ्या विचारात होतो. "

ती काय झालं " :, एनीथिंग सिरीयस? "

तो नाही काही नाही " :, सोड. "

ती तुझ्यासाठी एक आनंदाची बातमी आहे बरं " :? "

तो " .म्हणजे तुझ्या खडूस बापाने आपल्या लग्नाला परवानगी दिली तर " :

ती .हा ! माझ्या बाबांबद्दल मी काहीही वेडंवाकडं ऐकून घेणार नाही पुन्हा सुरु होतोयस तू" : " .पहिलेच सांगून ठेवते

तो चूक झाली" :, माफी असावी राणी सरकार, यापुढे असा नाही होणार. प्रॉमिस.

अरे बापरे नाकाच्या शेंड्यावर किती राग जमा झालाय. तुझं स्ट्राबेरी सारखं लाल झालय नाक, बघू जरा. "

ती " .राहू दे काही नको " :

तो " .बोलशील आता .सॉरी म्हटलं ना सोनू " :

ती " .मी परवा ताईकडे गेली होती तेव्हा तिला सांगितलं आपल्याबद्दल" :

तो बरं मग " :, काय म्हणाली ती? "

ती " .तिने भेटायला बोलावलंय तुला " :

तो कधी " :? "

ती ती तशीही घरीच असते .असेल तेव्हा तुला वेळ " :, तिचं बाळ लहान आहे ना. "

तो " .ठीक म्हणजे आता तुझ्या ताईवर इम्प्रेशन झाडावं लागणार तर " :

ती एक विचारू .ते तुझं तू बघ काय ते " :? म्हणजे मी आईशी बोलले, ताईशी बोलले, तू तुझ्या घरच्यांशी कधी बोलणारेस? "

तो झालं बोलून " :,  एकदा नव्हे दहादा. आईची काही हरकत नाही पण बाबांचं जरा अवघडच " .आहे

ती अच्छा " :, म्हणजे  तू उगाच माझ्या बाबांच्या नावाने बोंब मारत होतास. तुझ्या घरी पण तीच परिस्थिती आहेतर. "

तो विषय  पर्वा त्यांचा मूड जरा चांगला वाटला म्हणून .ते जरा जुन्या विचारांचे आहेत गं " : काढला तर म्हणाले, तिला या घरात सून करून आणलस तर तिच्यासकट तुला बोजा बिस्तरा देऊन घराबाहेर काढेन. "

ती बापरे मग आता " :? कसं  करायचं? "

तो तू नको टेन्शन घे " :ऊस मी करेन मॅनेज सगळं. एकदा फायनल विचारायचं घरी, नाही म्हणाले तर सरळ कोर्ट मॅरेज. "

ती आणि राहायचं कुठे "  :? "

तो माझ्या एका मित्राचा फ्लॅट आहे सानपाड्याला " :, तो काही इतक्यात तिथे राहायला जाणार नाही.  आणि .इन्व्हेस्टमेन्ट म्हणून त्याने घेऊन ठेवलायवर्षभरात सगळं होतं ग नीट. "

ती तर मग  तरीही नाहीच म्हणाले .आपण कन्व्हिन्स करू घरच्यांना .अजिबात नाही " : आपण कोर्ट मॅरेज करणार म्हटल्यावर  आणि तसंही  .शेवटचा पर्याय म्हणून कोर्ट मॅरेज आपण एक काम करू तुझ्या मित्र .आपल्याला फार काही खर्च येणार नाहीच म्हणाला विचार एखादा फ्लॅट कुणी रिसेल करत असेल तर. ,

आपल्या दोघांच्याही ससेविंग्स, एफडीज आहेतच.  .उरलेल्या पैशाचं लोन करू .त्या काढू " .सुरुवातीला थोडा त्रास होईल पण करू मॅनेज

तो " .तुला वाटतंय तितका सोपं नाहीये हे " :

ती " .नाहीये कठीण पण  " :

तो स्वप् " :न आपण पाहायची मग त्यांना  पूर्ण करायची जबाबदारी आपलीच आहे ना, ती पूर्ण

करण्यासाठी प्रयत्न आपणच करायला हवेत. "
तो " .बघू कसं काय होतं ते .ठीक " :
ती " हम्म " :
तो वाजले किती " :?
ती "१५ .८ " :
तो " .चल निघुया " :
ती लवकर आज " :? "
तो हो भूक लागलीये " :जाम. आपण मॅक डी मध्ये बसतो ना तिथे समोरच नवीन चायनीज " .तिथे जाऊन बसू .रेस्टॉरंट उघडलंय
ती " .घेईन मी फक्त सुपच " :
तो चालेल " :, चल लग्नाचं तर ठरलं आता हनिमूनचं प्लॅनिंग तिथे खाता खाता करू. "
ती आलास पुन्हा त्या विषयावर ! तुला त्याच्याशिवाय काही " :सुचतच नाही का रे? "
तो बरं सोड" :, चाल निघू. "

बागेत एखाद्या झाडाखाली कट्ट्यावर -, चौपाटीवर वाळूत बसून किंवा एखाद्या रेस्टॉरंट मध्ये अशी बरीच स्वप्न हि प्रेमी युगुलं पाहत असतात, रंगवत असतात, त्यांना पूर्ण करण्यासाठी प्रयत्नही करतात. काही पूर्ण होतात तर काही अर्ध्यावरच मोडतात. पण म्हणून कुणी स्वप्नं प्रयत्नही स्वपनं पाहायलाच हवीत आणि त्यांच्या पूर्ततेसाठी .पाहणं सोडत नाही
( सहज सुचलेलं ) .चंदन विचारे .हवेत करायलाच

---

10} <u>मिठी</u> :

नेहमीप्रमाणे आजही तो तिची वाट बघत बागेत बसलेला असतो. मस्तपैकी गार वारा सुटलाय, आकाश पांढरं आहे अजूनही, सूर्यास्ताला थोडा अवकाश आहे. .लाटांची छानशी गाज ऐकू येतेय विचारांचं काहूर माजलेलं असतं याच्या मनात मात्र.

हि अजून कशी आली नाही? हिला यायला एवढा उशीर का? सूर्यास्त होण्याआधी येईल ना हि? काय बरं झालं असेल? त्याची नजर कधी घड्याळाकडे तर कधी आकाशाकडे.

अशातच अलगद चोरपावलांनी ती मागनं येऊन त्याचे डोळे आपल्या नाजूक हातांनी मिटते.

दोघांनाही एकमेकांचे स्पर्श एव्हाना, अंगाचा सुवास ओळखीचा झालेला असतो.

तोये ..आलीस"-, आज उशीरा येण्याचा कोणता बहाणा सांगणारेस?

तीनेमकं निघायच्या वेळेसच .तुला ठाऊक आहे ना आमची फिल्ड कशी आहे ती .हे रे काय" - म्हणून त्याच दिवशी मी माझी नको असताना काम येतं आणि मग दुसर्या दिवशी वर्क लोड नको घरच्यायांशी खोटं बोलून सार्यांच्या नजरा चुकवत लपत छपत .कामं आटपून येतेतुला भेटायला येते याचं तुला साधं कौतुकपण नाही".

तो"सॉरी" -.

तीतेवढं बाकी बोललं कि झाली ना सुटका" -?.

बोलता बोलता ती मागनं पुढे त्याच्या शेजारी येऊन बसते. दोघंही एकमेकांच्या डोळ्यांत पहात असतात.

तीऑफिसमधे /घरी कुणाशी काही बिनसलय का तुझं" -?

तो" .नाही तर" -

तीमग आज माझं हसरं पिल्लू असं उदास का दिसतय" -?

तो"काही नाही गं सहज"-.

ती नक्की " -? का मला सांगायचं नाही म्हणून बोलतोयस असं?

तोछे गं" -, तुला नाही सांगणार तर कुणाला सांगणार मी".

तीमग असा गप्प का" -? बोल कि नेहमीसारखा".

तोसोनू तु मला सोडून तर नाही जाणार" - ना कुठे?

ती"मी सोडून गेली तर तू बरा जीवंत रहाशील .हे काय आता नवं खूळ " -.

तोम्हणजे" -?

तीअरे तुच म्हणतोस ना कि" -, मी तुझा श्वास आहे म्हणून".

तो"हं" -.

तीबर्याच इच्छा पुर्ण करुन .अजून बरच छळायचय तुला .मी बरी सोडेन तुला एकटं" -
" घ्यायच्यात तुझ्याकडनं.

तोहो का" -?

ती "बरं ऐक आपण एक छोटिशी गंमत करु" ."होच मुळी " -.

तो"आता हे काय नविन" -.

ती"तू फक्त मी सांगते तेवढं कर" -.

तो"सरकार जशी आपली आज्ञा" -.

ती"आता उभा रहा सरळ डोळे मिटून आणि हात लांब करुन" -.

तोहे असं" -?

तीतुझं माझ्यावर किती प्रेम .असं नाही रे " - आहे?

तो"एवढं" -.

ती .डोळे मी सांगितल्याशिवाय अजिबात उघडायचे नाहीत .हा बास बास असाच उभा रहा " -
"घट्ट मिटून ठेवायचे.

तो "बरं " -.

त्याने बाहू पसरवताच ती हलकेच त्याच्या मिठीत शिरते. तो गोंधळतो, थोडासा कावराबावरा होतो.

तो तू वेडी आहेस का "-? लोकं बघतील ना".

ती"तू नाही मारायचास .हा माझा डायलॉग आहे " -.

तो"बरं"-.

ती कसं वाटतय मी तुझ्या मिठीत आल्यावर " -?

तोशांत .ल्यावर जसं वाटत असेल ना तसचचंद्राला चांदणी मिठीत आ" -, खूप छान वाटतय आणि तुला?

तीनजर .आता असच मला तुझ्या मिठीत साठवून ठेव .तुझ्या मिठीतच रहावसं वाटतय" -ेत माझं रुप साठवून ठेवलयस ना तसं. एखाद्या छानश्या कुपीत सुगंधी अत्तर साठवून ठेवतात ना तसं अगदी, ठेवशील ना?

तो" हो मग काय" -.

तीझालं तर मग "-, मी अशीच राहिन तुझ्यापाशी तुझीच बनून तुझ्या हृदयात, तुझ्या मिठीत. "सोड आता मला.

तो"का रहा ना आशीच अजून थोडा वेळ "-.

ती"लोकं बघतायत आपल्याकडे .सोड ना " -.

तोहो का" -, मगाशी मीसुद्धा हेच बोलत होतो".

ती हो मग मी म्हणाली ना कि "-, हा माझा डायलॉग आहे तू नाही मारायचास".

दोघंही एकमेकांकडे पाहून खदखदून हसतात आणि पुन्हा विरून जातात एकमेकांच्या मिठीत.

---------------------------------------------------------------

## 11} <u>जात</u> :

तो आणि त्याचे बाबा या दोघांमधला हा संवाद..
तो-" बाबा आम्ही दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतलाय".
बाबा- "मला न विचारता?
तो - "तेच तर सांगायला आलोय. याआधीही मी तुम्हाला आमच्या प्रेमाविषयी कल्पना दिली होती".
बाबा-" हो पण मी तेव्हाही तुला नकारच दिला होता. तरीही ! अच्छा म्हणजे सांगायला आलायस तर, मला वाटलं परवानगी वगैरै मागायला आलायस कि काय. मी याआधीच माझा निर्णय तुला सांगितलाय. हे प्रेम, लग्न मला मान्य नाही. ती आपल्या जातीतली नाही ".
तो - "बाबा अहो जग कुठे गेलय आणि तुम्ही अजूनही या जातीपातीच्या जुन्या बुरसट विचारात अडकून पडलाय?
बाबा- "हो, तुझ्या दृष्टीने हे विचार जुने बुरसट, कालबाह्य असतील पण मी मानतो अजूनही".
तो- "अशक्य आहे तुमचं बाबा, अहो या निसर्गाने कधी कुणाला भरभरुन देताना घेणार्याची जात विचारल्याचं कधीतरी ऐकलय का? सांगा ना. गावातनं खळखळत वाहणार्या नदीने कधी विचारलीये तिच्या काठावर येऊन ओंजळीतून पाणी पिणार्याची किंवा तिच्या पात्रातून कळशी नी हंडे भरुन पाणी नेणार्याची जात? पहाटे गवाक्षातून डोकावणार्या सूर्य किरणांनी विचारलीये का त्या घरातल्यांची जात? एखाद्या फळाफुलांनी बहरलेल्या विशाल वृक्षाने विचारलीये का हो त्याच्या पायाशी फळे -फुले वेचणार्या किंवा त्याच्या सावलीला आलेल्या एखाद्या पाथंस्थाची जात? रात्रीच्या मिट्ट काळोखातही शीतल प्रकाश देणार्या नभीच्या चंद्राने विचारलीये का हो कधी कुणाला त्याची जात? अंगणात येऊन दाणे टिपणारे पक्षी कधी विचारतात का हो दाणे वेचण्याआधी आपली जात? पावसाने ओले चिंब करताना कधी विचारलीये कुणाची जात? सांगा ना बाबा, तुम्ही स्वतःला या निसर्गापेक्षाही श्रेष्ठ मानता?
बाबा-"तुझं हे पुस्तकी तत्वज्ञान मला नको शिकवूस. ते तुझं तुझ्यापाशीच ठेव. तुझ्या या अशा बोलण्याने मी माझा निर्णय अजिबात बदलणार नाही".

तो- "ठीक आहे तुम्ही तुमचा निर्णय बदलणार नसाल तर मग राहिलच, येतो मी. "

बाबा-"कुठे चाललायस?

तो- "निसर्गाच्या साक्षीने माझा संसार मांडायला. "

बाबा- "जा खुशाल जा, मी तुला अडवणार नाही पण एक लक्षात ठेव हा निसर्ग नसेल विचारत तुला तुझी जात. पण जगाच्या पाठीवर जिथे कुठे जाशील तिथे तिथे तुला अन हिला भेटणारी माणसं तुम्हाला तुमची जात विचारल्याशिवाय रहाणार नाहीत.
त्यांना नसेल काहीच घेणंदेणं तुमच्याशी पण तरीही ते विचारतील तुला तुझी जात.
शेवटी कुणीतरी म्हटलच ये जी जात नाही ती जात.

-----------------------------------------------------

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

“Language is the blood of the soul into which thoughts run and out of which they grow.”

– Oliver Wendell Holmes


www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा.

किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान®

esahity@gmail.com